आजच्या निवडणुका
आणि खोटे राजकारण




➢ पान २ वर


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com


लेंडी धरणग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करा
अन्यथा धरणाचे काम बंद करण्याचा प्रकल्पग्रस्तांचा इशारा



➢ पान ४ वर


वर्ष : ०५ | अंक : १५४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# पराभव दिसू लागताच इव्हिएमवरुन आरोप !

## राज ठाकरेंवर सुजय विखेंची जोरदार टीका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, अहिल्यानगर :** महापौरपद असो वा सत्तासमीकरण – मुंबईपासून महाराष्ट्रापर्यंत युतीचाच विजय निश्चित आहे, हे वास्तव दिसू लागताच विरोधकांकडून आरोपांचा पाऊस सुरू झाला आहे, असा सणसणीत आरोप भाजपाचे माजी खासदार सुजय विखे यांनी केला आहे. राज ठाकरे यांच्यावर थेट टीका करत विखे म्हणाले, शाई असो किंवा मार्कर – ते पुसले जात नाहीत. मतदान केंद्रात तुमचेच पोलिंग एजंट बसलेले असतात. पण जर तुमच्याच एजंटवर विश्वास नसेल, तर त्यांना तिथे ठेवायचंच कशासाठी? पराभव जवळ आला की असे आरोप केले जातात, हा जनतेला फसवण्याचा प्रयत्न आहे.

**‘२० वर्ष मुंबई शहराचं जे वाटोळं केलं, ते पुसता येत नाही’**

विखे यांनी याचवेळी मुंबईच्या कारभारावरही घणाघात केला. २० वर्ष मुंबई शहराचं जे वाटोळं केलं, ते पुसता येत नाही. त्यामुळे आता मार्कर पुसतो, शाई पुसते असे आरोप केले जात आहेत. पण जनतेला सगळं स्पष्ट दिसत आहे,असे सांगत त्यांनी विरोधकांवर राजकीय अस्वस्थतेचा ठपका ठेवला.



**'EVM नाही, विरोधकांची लाईट बंद झाली आहे’**

रोहित पवारांच्या संशयावर सुजय विखेंचा उपरोधिक पण आक्रमक पलटवार केला आहे राज्यातील काही ठिकाणी EVM मशीनवर संशय व्यक्त करत रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवरही सुजय विखे चांगलेच संतापले.

एक बटण दाबलं की दुसरी लाईट लागते, असे आरोप पुराव्याविना हवेत केलेले आरोप आहेत. नगरमध्ये सकाळी कमळाचं बटण दाबलं तर दुसरी लाईट लागली, असं म्हणायचं का? विरोधकांची लाईट लागल्यामुळे त्यांना एतचची लाईट दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे, असा खोचक टोला त्यांनी आमदार रोहित पवार यांना लगावला.

**‘चुकून कुठे त्यांची सत्ता आली तर EVM व्यवस्थित असतात, आणि आमची सत्ता आली की मशीन बिघडतात’**

विखेंनी पुढे सांगितले, हा प्रकार दर निवडणुकीत घडतो. चुकून कुठे त्यांची सत्ता आली तर EVM व्यवस्थित असतात, आणि आमची सत्ता आली की मशीन बिघडतात या दुटप्पी भूमिकेला काहीही अर्थ नाही. पुराव्याशिवाय आरोप करून लोकशाहीवर संशय निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे.



शिवसेनेचे उमेदवार शैलेश पाटील आणि दिवा गावातील नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला



कैलेश भगत आणि मित्र मंडळाने मतदान केले.



संतोष पाटील, दिगंबर भोईर, गुरुनाथ पाटील आणि साबे गावातील नागरिकांनी मतदान केले.

## नमुंमपा मुख्यालयात एकत्रित मतमोजणी अहवालाचे स्क्रीनवर प्रक्षेपण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि. १५, नवी मुंबई :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची मतमोजणी शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी १० वा. पासून विभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात होणार असून त्या प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र माध्यम कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी ज्या माध्यम प्रतिनिधींकडे मतमोजणी ओळखपत्रे आहेत, ते त्या ठिकाणी उपस्थित राहू शकतात. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात चौथा मजल्यावर विशेष समिती कक्षामध्ये सर्व आठही ठिकाणांवरील एकत्रित मतमोजणी अहवालाचे स्क्रीनवर प्रक्षेपण व्यवस्था करण्यात आलेली आहे, याची माध्यम प्रतिनिधींनी नोंद घ्यावी ही विनंती.

**मतमोजणी ठिकाण पत्ते :**

**१) दिघा – माता व बाल रुग्णालय इमारत, दिघा.**

**२) ऐरोली – सरस्वती विद्यालय, से.०५, ऐरोली**

**३) घणसोली – समाजमंदिर हॉल, भूखंड क्र.१०, सेक्टर-०७, घणसोली.**

**४) कोपरखैरणे – अण्णासाहेब पाटील सभागृह, १ ला मजला, से.५, कोपरखैरणे.**

**५) तुर्भे – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजमंदिर, प्लॉट नं.१८७, से.१०, सानपाडा.**

**६) वाशी – जलतरण तलाव संकुल, भूखंड क्र.१९६, १९६ए, से.१२, वाशी.**

**७) नेरूळ – पहिला मजला, आगरी कोळी भवन, प्लॉट नं.१२, से.२४, नेरुळ.**

**८) बेलापूर – दुसरा मजला, आगरी कोळी भवन, प्लॉट नं.१२, से.२४, नेरुळ.**

## मुळगाव येथे मेंढपाळ वर कुऱ्हाडीने वार; मेंढपाळ गंभीर जखमी



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण (सातारा) :** मुळगाव ता.पाटण येथे खड्ड्यातील उगवलेले गवत शेळ्या मेंढ्यांना चारले म्हणून मेंढपाळ शंकर अंकुश ठोंबरे वय ३० रा. आदुर्की खु. ता. फलटण यांच्यावर मारुती रामचंद्र कळके रा.मुळगाव ता.पाटण यांच्याकडून कुऱ्हाडीने वार व मारहाण झाली असून यात मेंढपाळ शंकर अंकुश ठोंबरे पान ३ वर

## पुरणगाव येथील तरुण शेतकऱ्याची यशोगाथा

### श्रीहरी हायटेक नर्सरीद्वारे दोन वर्षांत उल्लेखनीय प्रगती

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** शेतीपूरक व्यवसाय म्हणून रोपवाटिका व्यवसायाकडे तरुण शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येत असून पुरणगाव येथील समाधान आनंद घामरे यांनी स्थापन केलेली श्रीहरी हायटेक नर्सरी ही त्याचे उत्तम उदाहरण ठरत आहे. अवघ्या दोन वर्षांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी नर्सरी व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.





समाधान झांबरे यांनी पारंपरिक शेतीसोबत हायटेक नर्सरी व्यवसायाची सुरुवात केली. शेडनेट तंत्रज्ञान, ट्रे पद्धतीने रोप निर्मिती, सुधारित वाणांची निवड तसेच शास्त्रीय पद्धतीने पाणी व खत व्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे त्यांच्या नर्सरीतून दर्जेदार व निरोगी रोपे उपलब्ध होत असून परिसरातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. या नर्सरीमधून भाजीपाला व इतर पिकांची उच्च प्रतीची रोपे तयार करून स्थानिक तसेच शेजारील गावांतील शेतकऱ्यांना पुरवठा केला जात आहे. गुणवत्तेमुळे ग्राहकांचा विश्वास निर्माण झाला असून नियमित व स्थिर उत्पन्नाचा स्रोत तयार झाला आहे.

अल्प भांडवलात सुरू केलेला हा व्यवसाय आज यशस्वीपणे उभा राहिला असून श्रीहरी हायटेक नर्सरी इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सातत्यपूर्ण मेहनत व योग्य नियोजन यांच्या जोरावर नर्सरी व्यवसायातून शाश्वत उत्पन्न मिळू शकते, हे या यशोगाथेतून स्पष्ट होते.

## न.लो.संस्था गुहागर तालुका शाखेच्या वतीने नमन मंडळ आणि डॉक्टरांचा सन्मान

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि. १५, गुहागर (रत्नागिरी) :** नमन लोककलेचं जतन संवर्धन आणि नमन लोककलावंतांच्या न्यायहक्कासाठी अविरत कार्यरत असणारी नमन लोककला संस्था -गुहागर तालुका शाखेचा वर्धापन दिन सोहळा-२०२६ सुधाकर मास्कर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी भंडारी समाज भवन, गुहागर या ठिकाणी मोठया उत्साहात संपन्न झाला.

प्रसंगी वर्धापन दिनाचे औचित्यपर नमन या लोककलेचं जतन संवर्धन करत असलेले गाव /वाडी नमन मंडळ, नमन कलामंच, जेष्ठ लोककलावंत तसेच शिमगोत्सवात भोवनीचे देवखेळी यांना मोफत प्रथमोपचार सेवा देणारे तालुक्यातील सेवाभावी डॉक्टर यांचा शाल, पुष्पगुछ, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून गुहागर शहर नगराध्यक्षा नीता मालप यांची उपस्थिती लाभली होती. सदर वर्धापन दिन सोहळ्याला उद्योजक तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांचे विशेष सहकार्य लाभले. मनोरंजन म्हणून गुहागर तालुक्यातील सुप्रसिद्ध नमन मंडळ राजहंस नमन मंडळ गट -१ रांजाणेवाडी -वरवेली यांचे नमन



सादरीकरण झाले, खेळे, संकासूर या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले, राजेश बेंडल, नेत्रा ठाकूर, मनोहर घुमे, सुनील हळदणकर, पराग कांबळे,निलेश सुर्वे, कोमल जांगली, अमरदीप परचुरे आदी राजकीय /सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची ह्या भव्य दिव्य सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यकामाचे सूत्रसंचालन न. लो. संस्था गुहागर तालुका शाखा सहसचिव सुधीर टाणकर यांनी केले. वर्धापन दिन सोहळ्याला तालुक्यातील नमन कला प्रेमी, नमन मंडळ, गुहागर शहरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. न.लो.संस्था -गुहागर तालुका शाखा सचिव संदीप कानसे,उपाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले मानले आहेत. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जगन्नाथ शिंदे, सुधाकर मास्कर, संदीप कानसे,सुधीर टाणकर, प्रमोद घुमे,दीपक वेलुंडे, उदय दणदणे, प्रशांत भेकरे, अमित कताळे, अनिल रांजाणे, संजय कळंबाटे,शांताराम शिंदे आदी पदाधिकारी / सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

# आजच्या निवडणुका आणि खोटे राजकारण




राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुका एकदाच्या पार पडल्या आणि सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. आज निकाल काहीही लागो, दावे प्रतिदावे काहीही असोत मात्र आजकाल निवडणुकीचे चित्र पूर्णपणे बदललेले आपणास पहावयास मिळते. सर्वच निवडणूका सत्ताशक्ती आणि धनशक्तीच्याच बाजूने असल्याचे निकाल ओरडून ओरडून सांगताहेत. यातही काही नवीन होईल असे दिसत नाही. यापुर्वी राज्यातील एकूण २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींसाठी निवडणूक झाली. यात तेच झालं. या निवडणुकीत महायुतीनं महाविकास आघाडीला पछाडल्याचं चित्र निकालावरून पाहायला मिळालं. या निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीतील भाजप, शिवसेना आणि अजित पवार गट अनेक ठिकाणी एकमेकांविरोधात लढले. यावेळी बऱ्याच ठिकाणी वाद आणि तक्रारी पाहायला मिळाल्या. सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या मतमोजणीबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. विशेष म्हणजे राज्यात एकत्र असणाऱ्या सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही आघाड्या अर्थात महायुती व महाविकास आघाडी यातील मित्रपक्षांनी काही ठिकाणी स्वतंत्र तर काही ठिकाणी एकमेकांच्याच विरोधात लढण्याचा निर्णय घेतल्यामुळे यंदाच्या निकालांकडे राजकीय पक्षांबरोबरच मतदारांचंही लक्ष लागलं होतं.

या निवडणुकांमध्येही घराणेशाहीचा जोर दिसून आला. घराणेशाही जोपासण्यात आणि आपल्या शहराची सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आमदार, मंत्र्यांनी स्वत:च्याच नातेवाईकांना उमेदवारी दिली. भाजपमध्ये घराणेशाही नाही असा दावा भाजप नेते नेहमीच करतात. पण, आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र भाजपच्या मंत्र्यांच्या पत्नी, सुना आणि नातेवाईकांना तिकीट मिळालं. यामध्ये भाजपसह इतर पक्षांचे आमदारही मागे नसल्याचं चित्र दिसून आलं. शेवटच्या दिवशी आपापल्या पक्षाकडून एबी फॉर्म घेऊन उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सर्वपक्षीय इच्छूक उमेदवारांची झुंबड उडाल्याचं पाहायला मिळालं. मात्र त्यावेळी अनेक इच्छूक उमेदवारांना डावलल्यानं अनेक महिला आक्रमक झाल्या, अनेक ठिकाणी एबी फॉर्मची पळवापळवी, शिव्याशाप, रडारड, आरडाओरडा अन् काही ठिकाणी आत्मदहनाचाही प्रयत्न केल्याचं पाहायला मिळालं. काही कार्यकर्त्यांमधील संताप इतका अनावर झाला होता की, त्यांनी घटनास्थळीच नेत्यांचे फोटो फाडून आपला निषेध नोंदवला. तिकीट नाकारल्यामुळे हताश झालेल्या एका इच्छुक उमेदवाराने चक्क स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घराणेशाही आणि पीएवर मेहेरबानी झाल्याचे, जातीयवादाचेही आरोप झाले. निषेध व्यक्त करताना कार्यकर्त्यांनी नेत्यांचा एकेरी उल्लेख करत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली आणि घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला. गाडीला काळं फासलं, अनेक ठिकाणी राडा झाला. आवश्यक तिथे मोठा पोलीस बंदोबस्त ठेवावा लागला.

आजचे राजकारण स्वार्थाने बरबटलेले आहे. पक्षनिष्ठा राहिली नाही. स्वार्थासाठी व्यक्तिनिष्ठेलाही लोक तिलांजली देऊ शकतात. त्यामुळे आपल्या फायद्यासाठी राजकीय लोक काहीही करायला तयार होतात. म्हणून जनसामान्यांचा राजकारणी लोकांवरचा विश्वास उडत चालला आहे. लोकांची मानसिकताही बदलत चालली आहे. आज आपल्याकडे अनेक प्रश्न आहेत. त्याकडे विकासाच्या नव्हे तर स्वार्थाच्या दृष्टीने पाहिले जाते. येणारी नवी पिढीही आधीच्या लोकांना आदर्श मानत आहेत. राजकीय लोकांमध्ये नैतिकता नावाची गोष्ट राहिली नाही. त्यामुळेही सर्वसामान्य जनतेचा राजकारणाकडे पाहण्याचा तिरस्करणीय दृष्टीकोन असल्याचे दिसते. पैशाचा मोठ्या प्रमाणावर होणारा अपहार, सत्तेवर असतांना केलेले गैरव्यवहार आणि त्यातून जन्माला आलेली दडपशाही, राजकारणातील गुंडशाही हे सामान्य माणसाचे जगणे कठीण होऊन बसते. विकासाचे प्रश्न बाजूला पडतात. भ्रष्टाचार बोकाळतो. बेरोजगारी वाढते. जनतेच्या प्रश्नांचे या लोकांना काही देणेघेणे नसते. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने सहजगत्या हवेत विरतात. हेच स्वार्थी लोक जेव्हा निवडणूकपूर्व काळात, निवडणुकीदरम्यान पैशाचा बाजार मांडतात, तसाच तो सत्तेवर आल्यावरही मांडतात. त्यामुळे सामान्य मतदाराला आपण चुकीच्या व्यक्तीला निवडून दिले असा पश्चात्ताप मतदाराला होतो. याची दुसरी बाजूही तेवढीच दुखरी आहे. मतदाराला लालची बनवून टाकले आहे. त्यांना उमेदवाराकडून काहीना काही हवे आहे. निवडणूकीच्या पूर्वी भावींचे पीक फार जोरदार येते. यांच्यासह सर्व प्रस्थापित राजकारणी सर्व उत्सव, सणवार, नैसर्गिक आपत्ती यांचा ते पुरेपूर फायदा करून घेतात. त्यांच्या डोळ्यांपुढे स्वार्थी राजकारण असते. ते मतदारांना काहीना काही आमिषे देत असतात. निवडणूकीच्या दरम्यान पाचशे ते दोनहजार प्रति मतदार वाटप केले जातात. प्रसंगी पाचहजार वाटपालाही काही राजकीय पक्ष मागेपुढे पहात नाहीत. आता तर पैसे वाटपाचेही ऍप आले असल्याचे बोलले जात आहे.

राजकारणात खोटेपणा अधिक असतो. तो खूप असतो किंवा मोठ्या प्रमाणावर असतो. त्यामुळे धोका होऊ शकतो. पक्षनिष्ठावंतांवर अन्याय होत असतो. तशीही पक्षनिष्ठा राहिली नाही परंतु जे कोणी आहेत त्यांच्या भावना दुखावल्या जातात. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे तिकिटवाटपाचा कार्यक्रम होय. यात आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता असते. या प्रक्रियेत अधिकाधिक लोक प्रभावित होत जातात आणि निवडणूक झाल्यावर अनेक उमेदवार जे चांगले असतात ते सत्तेच्या साध्या झुळकेनेही बदलून जातात. खोटी आश्वासने देणे आणि ती पूर्ण न करणे हा एक महागडा दागिना त्यांना खूपच शोभून दिसतो. सर्वात मोठे कलावंत राजकीय नेतेच असतात. ते खोटे रडतात, ते खोटेच हसतात. खोटे अश्रूही ढाळतात. ज्याच्यावर प्रेम नाही त्याला ही प्रेम दाखवतात. राजकारणात येण्यासाठी काही विशेष पात्रता लागत नाही, जो देशासाठी समाजासाठी काम करू शकतो. जो इमानदारी ने काम करू शकतो तो राजकारणात येऊ शकतो, असे कुणी म्हटले तरी खरे वाटणार नाही. परंतु याऊलट परिस्थिती आपल्याला आपल्या सभोवती दिसते. राजकारण करतांना कधी कधी खोटे आरोप केले जातात. ते वास्तव स्थितीला धरुन असतील किंवा नसतील परंतु ते होतातच. त्यामुळे या खोट्या आरोपांना आव्हान दिले जाते. तेव्हा त्या दोन व्यक्तीमधील राजकीय द्वंद्व काही काळ चालू राहते. यामुळे बदनामी होते म्हणून मग अब्रुनुकसानीचा दावा ठोकण्याचा दावा ठोकला जातो. महिलांनी आणि युवकांनी राजकारणात यावे असे वारंवार म्हटले जाते परंतु तशी संधी दिली जात नाही. जनतेची दिशाभूल आणि पक्षांतर्गत राजकारणातील भूलथापा या सगळ्यांमुळे विश्वासाला तडे जातात. निष्ठेने आणि प्रामाणिकपणे वागणाऱ्यांना नैराश्य येते. राजकारण्यांच्या खोट्या बोलण्याला आपण तोंड देऊ शकतो, हे खरे आहे. पण राजकारण्यांना भ्रष्टाचार आणि खोटे बोलणे, खोटी आश्वासने देणे यांमुळे राजकीय क्षेत्राचे पावित्र्य नष्ट करण्याची परवानगी देण्याचा धोका आपण पत्करू शकत नाही, हेही तितकेच खरे आहे.

आजचे राजकारण हे समाजिक वर्गात दरी निर्माण करणारे गलिच्छ राजकरणआहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. दोन जातीधर्मांत तेढ निर्माण करणे, बेताल विधाने करणे, एखाद्या जातीय अथवा धार्मिक आस्थेवर बोट ठेवणे, अशांतता निर्माण करुन राजकीय पोळ्या भाजून घेणे हे सातत्याने सुरुच असते. लोकांपुढे भाषण करताना नेते मंडळी ८० टक्के समाजकारण अन् २० टक्के राजकारण करण्याचा आदर्श उद्घोष करतात. पण प्रत्यक्षात मात्र हे प्रमाण उलटे असते. म्हणजे ही मंडळी ८०- टक्के राजकारण करतात आणि २० टक्के किंवा त्याहून कमी समाजकारण करतात. एकदा आपण यांना निवडून दिले की यांचे समाजकारण संपते आणि राजकारण सुरू होते. खरे तर समाजकारणाची आठवण निवडणुकीच्या तोंडावरच येते. निवडणुका जवळ आल्या की आश्वासनांचा, सवलतींचा पाऊस पडतो. भावींची आणि इच्छुकांची मांदियाळी आपल्याला सर्वत्र दिसून येते. जागोजागी भले थोरले बॅनर्स लागलेले दिसतात. जनसंपर्क वाढवण्याचा प्रयत्न सतत सुरू असतो. कोणत्याही कार्यक्रमाला निधी दिला जातो. पाच वर्षे ज्यांचा चेहराही पाहिलेला नसतो ते नवा चेहरा किंवा आश्वासक चेहरा म्हणून पुढे येतात. ज्यांना विकासाची कुठलीही जाण नसते ते विकासाचे नवे पर्व म्हणून पुढे येतात. ज्यांनी नेहमी विकासाच्या गोष्टी सतत केलेल्या असतात तेच नेहमी वेगवेगळ्या निवडणूकीत वेगवेगळी आश्वासने देत असतात. दर पाच वर्षांनी विकासाची चर्चा होते. मग आधीच्या पाच वर्षांत त्यांनी काय केलेले असते? विरोधक त्यांच्यावर टीका करतात. त्याप्रमाणे विरोधकांना संधी मिळाली तर ते पुन्हा आजच्या सत्तार्धाय़ांप्रमाणेच बनतात. हेच सत्ताधारी पाच वर्षे राजकारणच करतात आणि निवडणुकीच्या तोंडावर आश्वासनांचेच जाहीरनामे तयार करतात. सरकारकडे पैसा, तरतूद असो वा नसो, तिजोरी खाली केली जाते. हे फुकट ते फुकट, हे माफ ते माफ अशी आमिषे दिली जातात. इतर राजकीय पक्षही त्यात मागे नसतात. तेही अवाढव्य आश्वासने देतात. राजकीय लोकांचा मानस असा असतो की आश्वासने ही पूर्ण करण्यासाठी दिलेली नसतात. त्यामुळे राजकारणात खोट्याचा बोलबाला अधिक असतो. हे मान्यच करावे लागेल.

राजकारणात घराणेशाही आणि गुन्हेगारी ही मोठीच समस्या आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात दोन-तीन कुटुंबाची मक्तेदारी पाहायला मिळते. कितीतरी घराणी महाराष्ट्राच्या राजकारणांत आपले सत्तास्थान राखून आहेत. सत्तेसाठी कधी या पक्षांत तर कधी त्या पक्षात जावून आपले मतदारसंघ शाबूत राखण्याचे प्रयत्न या राजकीय पिढयांनी कायम केले आहे. राजकारणांतील पक्ष उडयाबरोबरच यांचे एकमेकांत होणारे विवाह, नातेवाईंकाचा गोतावळा, यामुळे सत्ता या घराण्यांपर्यंत मर्यादित राहिली. ती कधीही सर्वसामान्यांपर्यंत झिरपू शकली नाही. परिणामी महाराष्ट्राच्या राजकारणांत नवीन नेतृत्वाचा विकास खुंटल्यांचे दिसून येते. कधी नवीन नेतृत्व उदयास येऊ लागले, की ही राजघराणी ते नेतृत्व चिरडण्याचे किंवा आपल्यात सामील करण्याचे काम करतांना दिसून येते.महाराष्ट्रातील राजकीय घराणेशाहीचा प्रमुख आधार म्हणजे सहकारी संस्था आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे अनेक घराणी राजकारणांत प्रस्थापित होतांना दिसून येत आहेत. या राजकीय घराण्यांनी आपली सत्ता आणि शक्ती कायम ठेवली आहे. त्यामुळे नेहमीच नवीन नेतृत्वाचा उदय होऊ शकला नाही. केवळ सत्ता उपभोगत संस्था, कारखाने आपल्या ताब्यात ठेवत प्रस्थापित होण्याचा प्रयत्न केला. पिढयांनपिढया सत्ता उपभोगली. महाराष्ट्रातील हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच घराण्यांनी राज्याच्या राजकारणांत सत्ता उपभोगली. परिणामी लोकशाही देशात सत्ता एकाच वर्गाकडे सीमित राहिली. ती कधी झिरपत सर्वसामान्यांकडे आलेली नाही. त्यामुळे विकास हा एका वर्गांचा होतांना दिसून येत येतो. गेल्या काही वर्षांत राजकारणाचे गुन्हेगारीकरण किंवा गुन्हेगारांचे राजकियीकरण हे मोठ्या वेगाने होताना दिसत आहे. वेगवेगळ्या पातळीवरून त्यावर नेहमी चिंतन होते; पण चिंतन आणि चिंता या पलीकडे हा विषय सरकताना दिसत नाही. आजकाल कोणत्याही पक्षाला निवडणुका जिंकण्यासाठी बाहुबल आणि बाहुबलींची आवश्यकता भासतेच. त्यामुळे या बाबतीत राजकीय पक्षांकडून काही ठोस पावले उचलली जातील, अशी भाबडी आशा बाळगण्यात काहीही अर्थ नाही. त्यामुळे सर्वसामान्य मतदार आणि राजकारणाच्या गुन्हेगारीबद्दल चिंता व्यक्त करणारे बुद्धिमंत या दोघांवर ही जबाबदारी येऊन पडते. मतदान हे बॅलेट मशीनवर न होता मतपत्रिकेवरच व्हावे अशीही मागणी जोरकसपणे पुढे येत आहे. बुद्धिवादी वर्गाने नुसतेच चिंतन किंवा चिंतन न करता आणि या सगळ्या प्रक्रिपासून अलिप्त न राहता प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य मतदारांनीही ऐन निवडणुकीत कोणत्याही क्षणिक आमिषाला बळी न पडता मतदान करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जोडीने व्यापक समाजप्रबोधन होण्याची आवश्यकता आहे. कारण राजकीय क्षेत्राचे शुद्धिकरण करायचे असेल तर जनतेलाच ते हाती घ्यावे लागेल. जनताच जर इथल्या प्रस्थापित राजकीय लोकांच्या हातचे बाहुले बनत चालली तर ते कदापिही शक्य होणार नाही, हे मी काळाच्या कपाळावर नोंदवून ठेवतो.

**प्रज्ञाधर ढवळे, नांदेड – मो. ९८९०२४७९५३.**

## इराणमधील खोमेनी यांच्या सत्तेला सुरुंग

इराणमधील खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेला नागरिकांचा उद्रेक थांबायचे नाव घेत नाही. इराणमध्ये खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून जनतेचे मोठे आंदोलन चालू असून या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ५४४ जणांचा बळी गेला असून १० हजाराहून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. हजारो आंदोलकांना अटक व ५४ आंदोलकांचा बळी जाऊनही इराणी नागरिक खोमेनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतच आहेत. खोमेनी सरकार हे आंदोलन चिरडण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे मात्र आंदोलक कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबवण्याच्या मानसिकतेत नाही. तेथील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने भारतानेही इराणमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर इराण सोडण्याचे आव्हान केले आहे. खोमेनी सरकार उलथवून टाकायचेच अशा मानसिकतेत आंदोलक असल्याने हे आंदोलन आणखी भडकण्याची शक्यता आहे. इराणमधील या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनाला अमेरिकेची फूस असल्याची चर्चा जागतिक माध्यमात आहे. चीन, रशिया या देशांनी तर तसा थेट आरोपच केला आहे. अर्थात हा आरोप चुकीचा आहे असे कोणीही म्हणणार नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून इराणवर त्यांची वक्रदृष्टी होतीच. इस्राईल - इराण युद्धात ही अमेरिकेने इराण विरोधात भूमिका घेतली होती. इराणमधील खोमेनी सरकार उलथवून टाकणार असे ते कायम म्हणत आले आहेत. इराणमधील खोमेनी सरकार मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असल्याने इराणवर अमेरिका हल्लाही करू शकते असा सज्जड दमही ट्रम्प यांनी इराणला दिला होता त्यामुळे इराणमधील या आंदोलनाला हवा देऊन खोमेनी यांचा परस्पर काटा काढण्याचा ट्रम्प यांचा डाव असू शकतो. व्हेनेझुएला प्रमाणे इराणमधील तेलसाठ्यावर देखील ट्रम्प यांची नजर आहे. खोमेनी अमेरिकेला ते सहजासहजी ते मिळवू देणार नाही म्हणून ते या आंदोलनाला धगधगत ठेवून खोमेनी यांचा काटा काढत आहे हे सत्य आहे. अमेरिका या आंदोलनाला पेटवत आहे हे जरी खरे असले तरी या आंदोलनाला खोमेनी हे स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. रियाल हे इराणचे चलन आहे. रियालचे गेल्या काही वर्षात प्रचंड अवमुल्यन झाले आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे १ डॉलर अशी रियालची अवस्था झाली आहे. त्यामुळे येथील नागरिक भयचित झाले आहे. रियालचे अवमुल्यन झाल्याने तेथे महागाईचा कडेलोट झाला आहे. अन्नधान्य, औषधे आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. रियालचे अवमुल्यन होऊन महागाई प्रचंड वाढली, जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे देखील आवाक्याबाहेर गेल्याने नागरिक रस्त्यावर उतरले. वास्तविक या आंदोलनाची सुरुवात मागील महिन्यातच झाली होती. नागरिक रस्त्यावर उतरत असतानाही महागाई कमी करण्यासाठी आणि रियालचे अवमुल्यन रोखण्यासाठी खोमेनी यांनी कोणतेही पावले उचलली नाही त्याचा फटका त्यांना बसला. मागील महिन्यात तेहरान या इराणच्या राजधानीत सुरू झालेले हे आंदोलन आता इराणच्या ३३ प्रांतात पसरले आहे. हे आंदोलन आणखी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे आणखी या आंदोलनात आणखी काही आंदोलनाचा जीव जाऊ शकतो. कदाचित हे आंदोलन खोमेनी यांचे सरकार उलथवूनही टाकेल. या आंदोलनाचा शेवट काय होईल हे येणारा काळच ठरवेल एकमात्र नक्की की या आंदोलनाने अनेक दशके सुरू असलेल्या खोमेनी यांच्या इराणमधील सत्तेला सुरुंग लागला आहे.

## विमान ..

कुठे राखली सत्ता
कुठे झाला पालट
वातावरण बिघडले
कायकरेलं पायलट

बांधा रे कंबर पेट्या
विमान करे झटापट
पॅराशूटचीहालचाल
चलाआवरा पटापट

मशीन मध्ये गडबड
कोण काढी खुस्पट
ऑईलिंग करताना
उरात घुसले धस्कट

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

प्रवासी तणावग्रस्त
किती चाले फरफट
काय दिले खायला
ढेकरा येती करपट

हवाई सुंदरी भयाण
पाय करती लटपट
अनाउन्समेंट सरली
बंद पडला बोलपट

विमानतळमहत्वाचे
बाकीचे सारे चिलट
मतदाता रे विधाता
करतो उलट सुलट

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## वाचक पत्रे

### देशांतील मध्यवर्ती सरकारने ग्रामीण भागाला उभारी देणे महत्वाचे

नुकताचं १८ व्या लोकसभेसाठी निवडणूका संपन्न होवून एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार अस्तित्वात आले. त्यामुळे देशांतील जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत एनडीए सरकार दहा वर्षे पूर्ण करुन पंधराव्या वर्षाकडे वाटचाल करीत असताना देशाच्या मध्यवर्ती सरकारने प्रामुख्याने महागाई कमी करुन ग्रामीण जनतेचा विचार करायला हवा. आपला भारत देश खेड्यांनी, वाडीवस्ती, दऱ्याखोऱ्यांनी बनलेला आहे आज भारत सरकार डिजिटल प्रणाली अवलंबली असली तरी अजुनही म्हणावे तसे नेटवर्क ग्रामीण असो अगर शहरी भागात पोहोचलेले नाही. त्यावर मोठ्या प्रमाणात काम करणे गरजेचे आहे. तसेच आज देशांमध्ये झपाट्याने विविध आजार वाढत आहेत, अनेकांना विविध आजारांनी ग्रासले आहे त्यावर उपचार करण्याकरिता ग्रामीण भागात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल नाहीत ती उभारणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात शिक्षणाची सोय होणे क्रमप्राप्त आहे. शिक्षण घेण्यासाठी अतिशय दुर्गम डोंगराळ भागातून सोय असेल त्या ठिकाणी जावे लागते वाटा नसतात जंगल ऊन, वारा, पाऊस, हिंस्र प्राणी यांना झगडत आणि सर्वांना चकवा देवून शिक्षण घ्यावे लागते. आज भारत सरकार एजंटगिरी नको म्हणून विविध योजनेची रक्कम थेट लाभार्थींच्या बँक खात्यात वर्ग करत आहे. पण अजुनही बँका ग्रामीण भागापर्यंत पोहचल्या नाहीत. त्यामुळे बँकांचे जाळे विस्तारणे महत्वाचे आहे. आपला भारत देश जगामध्ये कृषिप्रधान म्हणून गणला गेला आहे. त्यामुळे बळीराजाला विविध योजनेद्वारे बळ देणे महत्वाचे आहे. आगामी काळात भारत सरकारने या महत्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या मुद्यांना अग्रक्रमाने प्राधान्य देवून मार्गक्रमण करणे गरजेचे आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शासकीय आश्रम शाळेत समस्यांचा पाढा, आदिवासी विकास परिषद आक्रमक



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद शहापूर तालुका टिम यांनी शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, डोळखांब येथे प्रत्यक्ष भेट देत विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शाळेतील मूलभूत सुविधांचा अभाव, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी, वसतिगृहातील गैरसोयी, आहार व आरोग्याच्या समस्या यावर विद्यार्थ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने आपले प्रश्न मांडले. शिक्षणाच्या दर्जाबाबत नाराजी, शिक्षकांची अपुरी संख्या, वसतिगृहातील स्वच्छतेचा अभाव, तसेच शालेय साहित्य व दैनंदिन गरजांबाबतच्या अडचणी विद्यार्थ्यांकडून समोर आल्या. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्न गांभीर्याने घ्यावेत, अशी ठाम भूमिका परिषदेकडून मांडण्यात आली. यावेळी कोकण महाराष्ट्र उपाध्यक्ष रवींद्र मराडे, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रदीप दुटे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष योगेश गांगड, ठाणे जिल्हा सचिव मंगळू भला, शहापूर तालुका युवा अध्यक्ष प्रकाश भगत, शहापूर तालुका सहसचिव राजू भला, शहापूर तालुका कार्याध्यक्ष परशुराम पोकला, शहापूर तालुका सोशल मीडिया प्रमुख भरत सोंगाल कार्यकर्ते उपस्थित होते.

# खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचा ३६ वा वर्धापन दिन उत्साहात !

- ३५१ कर्मचाऱ्यांचे रक्तदान
- अहोरात्र मेहनतीमुळेच वीज निर्मितीचा विक्रम – संजय मारुडकर



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** राज्याच्या वीज निर्मिती क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचा ३६ वा वर्धापन दिन नुकताच एका भव्य 'महोत्सवा'च्या स्वरूपात साजरा करण्यात आला. १३४० मेगावॅट क्षमता असलेल्या या केंद्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांत अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठा सहभाग नोंदवला.

२० डिसेंबर ते ८ जानेवारी या कालावधीत चाललेल्या या महोत्सवात क्रीडा आणि कला गुणांचे दर्शन घडले. कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टेबल टेनिस, कॅरम, मॅरेथॉन क्रीडासह रांगोळी, चित्रकला, महिलांसाठी फन गेम्स, हाऊसकीपिंग स्पर्धा आणि 'हॅपी स्ट्रीट' अश्या नाविणपूर्ण कार्यक्रमाचा समावेश होता. तसेच सांस्कृतिक स्पर्धा, ऑर्केस्ट्रा, नाटक आणि आनंद मेळाव्याने या सोहळ्यात अधिक रंगत भरली होती.

उत्सवाचे औचित्य साधून सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये एकूण ३५१ महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या कार्यासाठी नागपूर मेडिकल कॉलेज, जीएसके ब्लड बँक आणि जीवन ज्योती ब्लड बँक यांनी तांत्रिक सहकार्य केले.

महोत्सवाचा सांगता समारंभ आणि पारितोषिक वितरण सोहळा महानिर्मितीचे संचालक (संचलन) संजय मारुडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले महानिर्मिती आज महाराष्ट्रात ९५०० मेगावॅट वीज निर्मिती करत आहे. हे केवळ आपल्या कर्मचाऱ्यांच्या अहोरात्र मेहनतीचे फळ आहे. अशा कार्यक्रमांमुळे कामाचा ताण हलका होऊन उत्साह वाढतो. केंद्राने प्रस्थापित केलेल्या वीज निर्मितीच्या विक्रमाबद्दल मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

या सोहळ्याला कार्यकारी संचालक राजेश पाटील, मुख्य अभियंता विवेक रोकडे, विजय राठोड आणि विलास मोटघरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांनी केले तर सूत्रसंचालन सुजाता दाभाडे यांनी केले.

कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, नारायण राठोड, सचिन डेगवेकर, अधिक्षक अभियंता विलास उके, गीतांजली पारखी, प्रवीण रोकडे, संदीप देवगडे, शिरीष वितोंडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, डॉ.मुकेश गजभिये, मेघराज निले आदी उपस्थित होते.

# शासकिय रेखाकला परीक्षेत श्री शिवाजी विद्यालयाचा १०० टक्के निकाल !

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव येथील श्री रंगदास स्वामी शिक्षण मंडळ संचालीत श्री शिवाजी विद्यालयाचा शासकीय रेखाकला परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला असुन या यशाबद्दल सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्व क्षेत्रातुन अभिंनदन करण्यात आले. रेखाकला परीक्षेत एकुण तेविस विद्यार्थी बसले होते. त्या पैकी इंटरमिजीएट परीक्षेत कु.लावान्या शेटे, निशा शिंदे, श्रतुजा देशमुख, यानी अ श्रेणीमध्ये यश मिळवले. तर,कु.भक्ती धोंडे,सारीका साबळे, अदित्य गाढवे, शुभांगी निर्वाण यांनी ब श्रेणीत यश मिळवले. तसेच इलिमेंटरी परीक्षेत पाच विद्यार्थांनी अ श्रेणीत यश तर,बाकी सर्व विद्यार्थांनी ब श्रेणीत यश मिळवले,या सर्व विद्यार्थांना मॅडम पांडे यांनी मार्गदर्शन केले. या सर्व यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विकास बनकर, गावचे सरपंच संध्याताई देशमुख, पारनेर तालुका भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष गोरख मेहेत्रे, उपसरपंच शिवाजी शिंदे, तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रकाशजी बोरा, उपाध्यक्ष जितेंद्र बोरा यांनी अभिंनदन केले आहे. विद्यालयातील शिक्षक शाम औटी, बापु घायाळ, बापु सलगर, श्रीकांत येणारे, प्रताप ठोकळ, सरोजा देशमुख, शर्मिला जगताप यांनी सर्व विद्यार्थांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# आचारसंहितेचे राजकीय पक्षासह सर्वांनीच तंतोतंत पालन करावे : प्रांत सोपान टोम्पे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण (सातारा) :** पाटण जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरूवार दि. ५ फेब्रुवारी रोजी मतदान व शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी अंतिम केली आहे. निवडणुकीसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावे लागणार आहेत. ७ गट व १४ गर्णासाठी ४०१ मतदान केंद्रावर १ लाख ३८ हजार ४८१ पुरूष व १ लाख ३५ हजार ७३ स्त्री असे एकूण २ लाख ७३ हजार ५४ इतके मतदार आहेत.व

दिलेल्या आचारसंहितेचे राजकीय पक्षासह सर्वांनीच तंतोतंत पालन करावे. निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पाटणचे प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोम्पे यांनी केले.



पाटण येथे प्रांत कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अनंत गुरव, नायब तहसीलदार पंडीत पाटील नायब तहसीलदार जयराम बोडके . निवडणूक नायब तहसीलदार विनायक पाटील, मंडलाधिकारी शिवाजीराव लुगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोपान टोम्पे पुढे म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी निवडणूक कार्यक्रमाची सूचना प्रसिध्द करण्यात येणार असून शुक्रवार दि. १६ जानेवारी ते मंगळवार दि. २० जानेवारी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत आणि बुधवार दि. २१ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंतही ही नामनिर्देशन पत्रे देण्याची अंतिम तारीख आहे. रविवार दि. १८ रोजी सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाही. तसेच दि. १६ ते दि. २१ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत नामनिर्देशन पत्र स्विकारली जाणार आहेत. गुरूवार दि. २२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली जाणार आहे. त्याचदिवशी छाननी पूर्ण झाल्यावर लगेचच वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. शुक्रवार दि. २३ व शनिवार दि. २४ रोजी आणि मंगळवार दि. २७ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. तसेच दि. २५ वं दि. २६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने यादिवशी अर्ज मागे घेतले जाणार नाहीत.

मंगळवार दि. २७ रोजी दुपारी ३.३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करून त्याचदिवशी चिन्ह वाटप केले जाणार आहे. तर गुरूवार दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत प्रत्यक्षात मतदान घेण्यात येणार असून शनिवार दि. ७फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी होणार आहे. अशा प्रकारे संपूर्ण निवडणुकीचा कार्यक्रम असणार आहे.

निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली आहे. सर्वच राजकीय पक्षाचे प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याबरोबरच सर्वसामान्य जनतेने काटेकोरपणे पालन करावे. मतदारसंघात एकूण मतदान केंद्रांची संख्या ४०१ इतकी आहे. आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन होण्यासाठी ४० झोन असून पाटण तालुक्यात चार भरारी पथके निर्माण केली आहेत. निवडणुकीसाठी अर्ज विक्री व स्विकारण्यासाठीची सुविधा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतीगृह पाटण येथे करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्जांसाठीचे पोर्टल २२ जानेवारीपर्यंत सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, मुंबई :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएसएस) अंतर्गत २०२५-२६ साठी नुतनीकरणासाठी पात्र असलेले तसेच २०२४-२५ मधील डी-डुप्लिकेशन प्रक्रियेत समाविष्ट असलेले तथापि विहित कालावधीत अर्ज करू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी एनएसपी २.० पोर्टल २२ जानेवारी २०२६ पर्यंत पुन्हा सुरू करण्यात आले आहे. राज्यातील सर्व संबंधित शाळांनी पात्र विद्यार्थ्यांचे नूतनीकरण अर्ज एनएसपी २.० पोर्टलवर २२ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करून घ्यावेत. त्याचप्रमाणे सर्व अर्जांची प्रथम स्तर आणि द्वितीय स्तर पडताळणी २२ जानेवारीपर्यंत पूर्ण करावी. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याने सर्व प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळेत मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी केले आहे.

# महिला लोकशाही दिनाचे १९ जानेवारी रोजी आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, मुंबई :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या वतीने महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार महिला लोकशाही दिन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे आयोजित करण्यात येणार आहे, असे मुंबई शहरच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

या उपक्रमांतर्गत पीडित महिलांना त्यांच्या तक्रारी व अर्ज सादर करण्यासाठी जिल्हा पातळीवर सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, २१५ बी.बी. डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई – ४०००२५ येथे तक्रार अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. तक्रार दाखल करताना अर्ज निर्धारित नमुन्यात भरावा. तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या असाव्यात. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, अपूर्ण अर्ज, धर्म व राजकारण विषयक बाबी अथवा वैयक्तिक स्वरूप नसलेल्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत.

# पेण तहसील कर्मचाऱ्यांनी पेण पोलिसांना हरविले

## डिके चषक २०२६ चे शानदार उद्घाटन !



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि. १५, पेण (रायगड) :** पेण येथील समाजसेवक दत्ता कांबळे उर्फ डिके आयोजित भव्यदिव्य टेनिस क्रिकेट सामन्यांत झालेल्या उद्घाटनीय सामन्यात पेण तहसिल कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ठ खेळ करीत पेण पोलिसांना पराजित केले. सदर क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वक्रतुंड मित्र मंडळाचे संस्थापक दत्ता कांबळे, श्रीमती साधना कांबळे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, राजेश्री कांबळे, माजी सरपंच मंगेश पाटील, प्रवीण पाटील, विनायक पाटील, राजू कांबळे, राज कडू, स्वप्नील पाटील, गजानन पाटील, ओमकार डाकी, सचिन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

डिके चषक २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी नेहमीच जनतेच्या सौरक्षणासाठी तत्पर असलेले पेण पोलीस आणि महसूल विभागात नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देणारे तहसील कर्मचारी यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. या लढतीत तहसील कर्मचारी यांनी नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली. पेण पोलिसांनी संयमी खेळ करीत पाच षटकात ४८ धावांचे आव्हान तहसील समोर ठेवले. यावेळी पेण तहसील कर्मचारी यांनी उत्कृष्ठ व संयमी खेळ करीत शेवटच्या चेंडूत जोरदार चौकार लागवून ५० धावा करत दणदणीत विजय मिळवला. सदर प्रेक्षणीय सामन्यात विजेता ठरलेल्या पेण तहसील कर्मचारी संघाला आयोजक दत्ता कांबळे यांच्या हस्ते भव्यदिव्य ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

पान १ वरुन

## मुळगाव येथे मेंढपाळ वर कुऱ्हाडीने वार

हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कृष्णा हॉस्पिटल कराड येथे उपचार सुरू असताना दिलेल्या जबाबातून पाटण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली आहे. पाटण पोलिसांनी या फिर्यादीवरून आरोपी मारुती रामचंद्र कळके यांना अटक केली असून पाटण न्यायालयात त्याला जामीन मंजूर झाला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत अधिक मिळालेल्या माहिती व पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारी वरुन मेंढपाळ शंकर अंकुश ठोंबरे रा. आदुर्की खु. ता. फलटण जि. सातारा हे आपल्या नातेवाईकांसोबत मुळगाव ता. पाटण येथे शेळ्या मेंढ्या चारण्यासाठी आले होते. दि. ०९/०१/२०२६ रोजी मुळगाव येथील एका शेतात यांच्या सर्व शेळ्या मेंढ्या बसवल्या होत्या. दुसऱ्या दिवशी शंकर ठोंबरे हे नेहमी प्रमाणे शेळ्या मेंढ्या चारणेकरीता शेळ्या मेंढ्या घेवुन मुळगाव पासुन काही अंतरावर जंगल डोंगर भागात घेवुन गेले होते. सायंकाळी शेळ्या मेंढ्या यांना चरवून ज्या ठिकाणी राहिले त्या ठीकाणी येत असताना जंगलात एका खड्ड्यात गवत उगवलेले दिसले म्हणुन त्या ठिकाणी शेळ्या मेंढ्या यांना चरवत होते. त्यावेळी तेथे मारुर्ती रामचंद्र कळके रा. मुळगाव हा अनोळखी इसम हातात कु-हाड घेवून आला व म्हणाला की, तु माझे जागेत शेळ्या मेंढ्या का चरवत आहे. असे बोलुन ठोंबरे यांना आई वरुन शिवीगाळ करु लागला. त्यावेळी ठोंबरे यांनी त्याला सांगितले की मला शिव्या देवु नका मी माझ्या शेळ्या मेंढ्या बाहेर काढतो. असे म्हणाल्यावर त्या अनोळखी इसमाने हातातील कु-हाडीने शंकर ठोंबरे यांच्या चेह-यावर मारले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत पाटण पोलिसांनी कलम ११८ (२), ३५२ प्रमाणे आरोपी मारुर्ती रामचंद्र कळके याच्यावर कारवाई केली असून त्याला या प्रकरणी अटक करुन पाटण न्यायालयात नेले असता न्यायालयाने जामीन मंजूर केला असल्याचे पाटण पोलिसांनी सांगितले.

# लेंडी धरणग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करा अन्यथा धरणाचे काम बंद करण्याचा प्रकल्पग्रस्तांचा इशारा

## येत्या जि.प., पंचायत समिती निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा दिला इशारा

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१५, मुखेड (नांदेड) :** लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या तात्काळ पूर्ण करण्यात यावे अन्यथा धरणाचे काम बंद करण्याचा ईशारा प्रकल्पग्रस्तांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

मुक्रमाबाद हे गाव लेंडी प्रधान प्रकल्प बुडीत क्षेत्रात येत असून गावचे पुर्नतः प्रश्न प्रलंबीत आहेत. आज मातीला प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर असून घरे व शेती शासन संपादीत करूनही, ना मावेजा, ना सानुग्रह अनुदान, ना वाढीव कुटूंब हे सर्व प्रश्न प्रलंबीत असून येत्या २१ जानेवारी पर्यंत प्रलंबीत प्रश्न मार्गी लावण्यात यावे अन्यथा येत्या दि.२२ जानेवारी रोजी लेंडी धरणाचे चालू असलेले सर्व कामे बंद करण्याचा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला असून येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर मुकमाबादकरांकडून बहिष्कार टाकण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



### लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्या

“मुक्रमाबाद येथील सानुग्रह अनुदान त्वरीत वाटप करण्यात यावे. मुळ कुटूंबाचे नोटीस देवून खूप कालावधी लोटला पण बऱ्याच धरणग्रस्तांना मावेजा देण्यात आला नाही ते त्वरीत देण्यात यावे. ज्या धरणग्रस्तांचे संयुक्त नोटीस आलेले आहेत त्यांचे नोटीस वेगवेगळ्या करून मावेजा देण्यात यावे. वाढीव कुटूंबाचे मावेजा देण्यात यावा. तसेच वाढीव कुटूंबाची अंतीम यादी करत असताना लग्नाची अट शिथिल करण्यात यावी. ज्या धरणग्रस्तांच्या घरात विहीरी व भुयार (तळघर) आहे त्याचा मावेजा मिळाला नाही ते सर्वे करून मावेजा देण्यात यावे. सुशिक्षित युवकांना नौकरी ऐवजी एक रकमी दहा लक्ष रूपये देण्यात यावे. दिव्यांग व घटस्फोटीत, विधवांना आर्थिक मदत देण्यात यावी.

पुरूषा प्रमाणेच महिलांही स्वेच्छा पुनर्वसनाचा लाभ देण्यात यावा. मागील ऑक्टोबर महिन्यात झालेल्या महापुरामुळे ज्यांचे आर्थिक नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

लेंडी प्रकल्पात एकुण १२ गावे गेले असुन त्यातील १० गावांना दिला गेलेला लाभ मुकमाबाद व वळंकी या गावातील प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावे. स्मशानभूमी, कबरस्थान, दफनभूमी, दहनभूमी या सर्व सुविधा त्वरीत करून देण्यात याव्या.

नवीन निकषाप्रमाणे धरणग्रस्त प्रमाणपत्र मुकमाबाद, वळंकी, ईटग्याळ येथील प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे. शिवाय वाहतुक भत्ता, स्थलांतरीत भत्ता, बांधकाम अनुदान, इंदिरा अवास योजनेचा लाभ परिपत्रकानुसार देण्यात यावा.

यासह विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून प्रलंबित मागण्यावर सारासार विचार करून त्यांच्या भवितव्यावर गंडांतर येणार नाही याची काळजी घ्यावी व लेंडी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून द्यावे असे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले असून निवेदनावर माधवराव देशमुख यांच्या सह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# थोडक्यात

## समृद्ध पंचायत राज अभियानात घोलवडची भुरळ भाऊ कदम यांचा दौरा



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१५, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील चिकूसाठी प्रसिद्ध तसेच राज्यातील तिसरे ‘मधाचे गाव’ म्हणून ओळख असलेल्या घोलवड गावाला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मंगळवार, दि.१३ जानेवारी रोजी सिनेअभिनेते भाऊ कदम यांनी भेट दिली. निसर्गसंपन्नता, स्वच्छता आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे घोलवड हे गाव राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच या अभियानात घोलवड गाव प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकावण्यास पात्र असल्याचे मतही त्यांनी मांडले.

घोलवड गावातील टोकेपाडा येथील अमृत सरोवर योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या तलावाची पाहणी भाऊ कदम यांनी केली. यासोबतच महिलांच्या बांबू हस्तकला वस्तूंचे कौतुक करत त्यांनी स्थानिक महिलांशी संवाद साधला. कोलपाडा येथील कृषी पर्यटन केंद्रालाही त्यांनी भेट दिली. यावेळी सरपंच रवींद्र बुजड, उपसरपंच कुणाल शहा, ग्रामपंचायत अधिकारी गुरुनाथ वारघडे यांनी त्यांचे स्वागत करून घोलवड गावातील चिकू उत्पादन, मधमाशी पालन आणि मध उत्पादनाबाबत सविस्तर माहिती दिली. मधमाशी पालन करणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद साधताना भाऊ कदम यांनी स्थानिक पातळीवर उत्पादित मधाची चव चाखली आणि त्याच्या गुणवत्तेचे विशेष कौतुक केले. वारली चित्रकार राकेश दळवी यांच्याकडून वारली कलेचे विविध पैलू समजून घेतले. प्राथमिक मराठी शाळेच्या मैदानावर आयोजित आदिवासींच्या पारंपरिक तारपा नृत्यातही त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. घोलवड गाव स्वच्छता, स्वावलंबन आणि सांस्कृतिक जतन यांसारखे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत असल्याने भविष्यात या गावाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळेल, असा विश्वास व्यक्त करत भाऊ कदम यांनी विनोदी शैलीत उपस्थितांशी संवाद साधला. शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## जिजाऊ व विवेकानंदांचे कार्य महिला व युवकांसाठी आजही प्रेरणादायी : प्रकाश इघे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १२ जानेवारी सोमवारी महाराष्ट्राच्या मातीत स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न पेरणाऱ्या राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि समाजसेवेचे प्रेरक युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची संयुक्तरित्या जयंती अतिशय उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक मल्हारी वाघसकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश इघे होते.

प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना राजकारणाचे व युद्ध नीतीचे बाळकडू लहानपणा पासूनच वडिलांकडून मिळाले. जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर घडविलेले संस्कार, स्वराज्य उभारणीत मार्गदर्शन, युद्धनीती, न्यायनिवाड्यांचे महत्त्व तसेच स्वामी विवेकानंदाचे समाजवादी विचार, समानता आणि युवकांमध्ये ध्येयनिष्ठा रुजविण्याचे त्यांचे कार्य संस्मरणीय ठरले. यावर सविस्तर ज्येष्ठ सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश इघे यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थीनींनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा धारण केल्याने कार्यक्रमाला आणखी आली. शिक्षक मनोगतात निलेश जासुद यांनी विद्यार्थ्यांना उद्याचा शिवबा घडवणारी राजमाता जिजाऊंच्या कार्य कर्तृत्वाची व जबाबदर नेतृत्वाची माहिती सांगितली.

# वरवाडा येथे महामार्गावरील पादचारी पूल हटवल्याने कन्या आश्रम शाळेतील विद्यार्थिनी असुरक्षित

## आ.विनोद निकोले यांचा आंदोलनाचा इशारा !

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१५, तलासरी(पालघर) :** तलासरी तालुक्यातील वरवाडा गावाजवळ मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर असलेला पादचारी पूल अचानक हटवण्यात आल्याने परिसरातील शालेय विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. विशेषतः महामार्गाच्या पश्चिम बाजूस असलेल्या पीएम श्री शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रम शाळेतील शेकडो विद्यार्थिनींना दररोज या गजबजलेल्या महामार्गावरून जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे.

या ठिकाणी असलेला लोखंडी पादचारी पूल गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थिनी, पालक, ग्रामस्थ व स्थानिक नागरिकांसाठी सुरक्षिततेचा एकमेव आधार होता. मात्र, कोणतीही पूर्वसूचना, लेखी आदेश किंवा स्थानिक प्रशासनाशी चर्चा न करता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या परवानगीनुसार हा पूल तात्पुरत्या स्वरूपात हटवण्यात आला. मोठ्या आकाराचे औद्योगिक साहित्य वाहून नेणाऱ्या खासगी कंपनीच्या वाहनांना अडथळा येत असल्याचे कारण पुढे करण्यात आले असले, तरी या निर्णयामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.



**या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत डहाणूचे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड मान्य केली जाणार नसल्याचे सांगत, जर तात्काळ पादचारी पुलाची सुरक्षित व कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आली नाही, तर १९ जानेवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमात आणि प्रस्तावित मोर्चामध्ये हा मुद्दा केंद्रस्थानी असेल, तसेच चारोटीपासून पुढे मोर्चा जाऊ दिला जाणार नाही, असा ठाम इशारा त्यांनी दिला आहे.**

**स्थानिक ग्रामस्थांच्या माहितीनुसार, या पुलाच्या कटिंगसाठी वरवाडा ग्रामपंचायतीची कोणतीही लेखी परवानगी घेण्यात आलेली नाही. पुलाचे लोखंडी भाग ट्रक व टिपरमधून हलवताना दुचाकीस्वार, पादचारी आणि इतर वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात आल्यानंतर अखेर वाहतूक पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने हस्तक्षेप करत काम तात्पुरते थांबवले.**

**दरम्यान, ग्रामस्थ, पालक आणि शाळा प्रशासन यांनी एकत्र येत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या या निर्णयाचा निषेध केला असून, तात्काळ सुरक्षित, उंची वाढवलेला व कायमस्वरूपी पादचारी पूल उभारण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या वेळी तालुका सेक्रेटरी लक्ष्मण डोंभरे, नंदकुमार हाडळ, बाबू कुऱ्हाडा, शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच पोलीस प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.**

पुलाचे अर्धवट कटिंग झाल्यामुळे सध्या परिस्थिती अधिकच धोकादायक बनली आहे. वेगाने धावणारी अवजड वाहने, सततची वाहतूक आणि कोणतीही पर्यायी सुरक्षित व्यवस्था नसल्याने विद्यार्थिनींना महामार्ग ओलांडताना प्रचंड भीतीचा सामना करावा लागत आहे. पालकांनी आपल्या मुली शाळेत पाठवाव्यात की नाही, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

दरम्यान, पुलाचे कटिंग सुरू असताना मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. कोणतेही सूचना फलक, वाहतूक नियोजन किंवा सुरक्षेची व्यवस्था न करता काम सुरू ठेवल्याने वाहनचालकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. खासगी कंपनी आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणावर यावेळी नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**महामार्गावर मोठ्या आकाराचे एलिमेंट वाहून नेणाऱ्या वाहनांना अडथळा येत असल्याने संबंधित पादचारी पूल तात्पुरता हटवण्यात आला आहे. लवकरच पुलाची उंची वाढवून तो नव्याने पूर्ववत करण्यात येईल.**

**– सुहास चिटणीस, मुख्य कार्यकारी अधिकारी (महाप्रबंधक), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण**



# पत्रकार हे घेणारे नाही; तर देणारे - डॉ. विश्वासराव आरोटे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने निघोज येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** समाजासाठी आपल्या लेखनीच्या माध्यमातून अहोरात्र काम करणारे पत्रकार हे समाजाला देणारे असून घेणारे नाहीत असे स्पष्ट प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.

निघोज येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने मळगंगा ग्रामविकास ट्रस्टच्या सभागृहात पत्रकार दिनाचे औचित्य साधत पत्रकार गुणगौरव आणि सन्मान सोहळा नुकताच संपन्न झाला. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे हे होते. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर आणि माता मळगंगा यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद यांनीही पत्रकारांचा गुणगौरव करून, समाजामध्ये परिवर्तन घडवण्याची ताकद पत्रकारांमध्ये आहे. श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे कार्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी पत्रकारांनी केलेली मदत कदापिही विसरता येणार नाही. आज समाजामध्ये अनेक समस्या आहे. समाज जागृतीसाठी पत्रकारांनी विशेष काम करावे. ट्रस्टच्या माध्यमातून आमचा प्रयत्न आहेच. पत्रकारांनी समाजाला एकत्र आणण्याचे काम करावे, असे कवाद म्हणाले.

या कार्यक्रमास संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, ज्येष्ठ पत्रकार दत्ता उनवणे, मुकुंदराव निघोजकर, विनोद गायकवाड, सचिव संतोष कोरडे, सोमनाथ गोपाळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर उपाध्यक्ष वसंत रांधवण, श्रीनिवास शिंदे, शहराध्यक्ष सचिन जाधव, कार्याध्यक्ष अनिल चौधरी,दिपक वरखडे,विकास शेंडकर,संपत वैरागर, भगवान मंदिलकर, विजय रासकर,आनंदा भुकन, नितीन परंडवाल, सुनील लोणकर,सागर आतकर,रोहन उनवणे,मेजर उल्हारे, बनसोडे, राऊत यांच्यासह अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.